**वाचले :-**

१. शासन राजपत्र, सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना क्रमांक एसआरव्ही-१०७६/१२, दि.२१/०६/१९८२
२. शासन राजपत्र, महसूल व वन विभाग अधिसूचना क्र.परिक्षा १४८५/३६२०/४३६/ई-७ दि.१८/०१/१९८८
३. शासन राजपत्र, महसूल व वन विभाग, अधिसूचना क्रमांक १४९१/ प्र.क्र.३३७/ई-७ दि.२०/०७/१९९३
४. शासन राजपत्र, महसूल व वन विभाग, अधिसूचना क्रमांक एसआरव्ही १४९४/प्र.क्र.८६३/(१)/ई-७ दि.२७/०१/१९९६
५. शासन, महसूल व वन विभागाकडील पत्र क्र.एसआरव्ही २१९५/प्र.क्र.८४/ई-७ दि.१७/०२/१९९८
६. शासन राजपत्र, महसूल व वन विभाग, अधिसूचना क्रमांक परिक्षा १२८५/२७७५/प्र.क्र.३३९/(भाग २)/ ई-७ दिनांक ७ जुलै, १९९९
७. मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण,मुंबई यांनी मुळ अर्ज क्र.२८८/२०१३ मध्ये दि.१६/१२/२०१४ रोजी दिलेले आदेश
८. मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण,मुंबई यांनी मुळ अर्ज क्र.३५४/२०१५ मध्ये दि.०२/०२/२०१७ व दि.०३/०२/२०१७ रोजी दिलेले आदेश
९. या कार्यालयाकडील ज्ञापन क्र.मशा/आस्था-१/अ-८(१)/ज्ये.या.लिपि./प्र.क्र.१५/१७ दि.१५/०२/२०१७
१०. कार्यालयीन मंजूर टिपणी दिनांक ०९/०३/२०१७

-------------------------------------------*********-------------------------------------------

क्र.मशा/आस्था-१/अ-८(१)/अं.ज्ये.या.लि.टं/प्र.क्र.१५/१७
जिल्हाधिकारी कार्यालय रायगड
अलिबाग, दिनांक ०९/०३/२०१७

**ज्ञापन**

मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे दाखल मुळ अर्ज क्र.३५४/२०१५ मध्ये मा. न्यायधिकरणाकडील वरिष्ठ खंडपीठाने दि.०२/०२/२०१७ रोजी (दुरस्ती आदेश दि.०३/०२/२०१७) आदेश पारीत केलेले असून, यापुर्वी मूळ अर्ज क्र.२८८/२०१३ मध्ये दिलेले आदेश रद्दबातल ठरवून, उक्त आदेशानुसार तयार करण्यात आलेल्या लिपिक-टंकलेखक संवर्गाच्या ज्येष्ठता याद्या देखील रद्द ठरविल्या आहेत.

त्यानुसार, उपोद्घातातील अ.क्र.९ कडील ज्ञापनान्वये या कार्यालयाच्या आस्थापनेवरील लिपीक-टंकलेखक संवर्गाची **दि.०१/०१/२०१३** या अर्हता दिनांकावरील सुधारीत प्रारुप जेष्ठता यादी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर यादी लिपिक-टंकलेखक संवर्गातील सर्व कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून, जेष्ठता यादी पाहिल्या बाबत त्यांची स्वाक्षरी घेऊन कार्यालयीन कागदोपत्री ठेवावी आणि जेष्ठता यादीस त्यांचा काही आक्षेप असल्यास त्या आक्षेपासंबंधीचे त्यांचे लेखी निवेदन दि.२८/०२/२०१७ पर्यंत या कार्यालयाकडे पाठविण्याबाबत सर्व कार्यालय प्रमुख/शाखा प्रमुख यांना निर्देश करण्यात आलेले आहे.

उक्त सुधारित प्रारूप जेष्ठता सूचीबाबत लिपिक-टंकलेखक संवर्गातील ०९ कर्मचाऱ्यांचे आक्षेप मुदतीत या कार्यालयाकडे प्राप्त झालेले आहेत. सदर आक्षेपांच्या अनुषंगाने उपोद्घातातील अ.क्र.१ ते ६ कडील नियामातील तरतूदी व उपोद्घातातील अ.क्र.८ कडील मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांनी दिलेल्या निर्देशानुसार अंतिम निर्णय घेण्यात आलेला असून, सदर निर्णयाचे प्रपत्रसह लिपिक-टंकेलेखक संवर्गाची तयार करण्यात आलेली **दि.०१/०१/२०१३** या अर्हता दिनांकावरची सुधारीत अंतिम जेष्ठता यादी सोबत जोडण्यात येत आहे.

तरी सर्व कार्यालय/शाखा प्रमुख यांनी उपरोक्त परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे प्रारुप ज्येष्ठता यादीत आवश्यक ते फेरबदल करुन, दुरुस्त केलेली लिपिक-टंकलेखक संवर्गाची **दि.०१/०१/२०१३** रोजीची सुधारीत अंतिम जेष्ठता यादी लिपिक-टंकलेखक संवर्गातील सर्व कर्मचाऱ्यांच्या (रजेवर असलेल्या व निलंबीत

असलेल्यांसह) निदर्शनास आणून द्यावी. अंतिम जेष्ठता यादी पाहिल्याबाबत संबंधीत कर्मचाऱ्यांची स्वाक्षरी घेऊन, कार्यालयीन कागदोपत्री ठेवावी व तसा अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा.

सही XXX
(शीतल तेली-उगले)
जिल्हाधिकारी रायगड

प्रत :- मा.विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई यांजकडे माहितीसाठी रवाना.
प्रत :- उपविभागीय अधिकारी,पनवेल/अलिबाग/माणगांव/महाड/कर्जत/पेण/रोहा/श्रीवर्धन
प्रत :- उपजिल्हाधिकारी (भूसंपादन),मेट्रो सेंटर क्र.१,३ पनवेल/उरण/काळ प्रकल्प माणगांव/रायगड (०)
प्रत :- तहसिलदार पनवेल/कर्जत/खालापूर/उरण/पेण/अलिबाग/मुरुड/रोहा/सुधागड/तळा/माणगांव/महाड/पोलादपूर/म्हसळा/श्रीवर्धन/अधिक्षक माथेरान
प्रत :- शाखा प्रमुख,महसूल शाखा/ सामान्य खाखा/ लेखा शाखा/ पुनर्वसन शाखा/ सं.गां.यो.शाखा/ बि.शे.शो.मो. शाखा/नोंदणी शाखा/ उप चिटणीस शाखा/पुरवठा शाखा/ निवडणूक शाखा/नगरपालिका प्रशासन शाखा/ रो.ह.यो.शाखा/भूसंपादन शाखा/करमणूक कर शाखा/नियोजन शाखा/कुळवहिवाट शाखा/ खनिकर्म शाखा
प्रत :- अध्यक्ष, रायगड जिल्हा महसूल कर्मचारी संघटना, रायगड यांस
प्रत :- आदेश संचिका-२०१७

जिल्हाधिकारी रायगड करीता